भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५५३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०८/२०१७

**१) संगनमत करून शेतीचे फेरफार पडताळणी कार्यवाही वेळी लाचेची मागणी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०४/०७/२०१७ चे १३.१६ वा. दर. यातील दोन्ही आरोपी यांनी अनिल लाखाराम रामटेके वय ५५ वर्ष रा. ठवरे नगर वार्ड क्र. ०२ मुरमाडी लाखनी त्याचे जांभळी येथील खरेदी केलेली गट क्र. २९ मधील शेतीचे फेरफार करून दोन्ही आरोपी यांनी संगनमत करून पळताळणी कार्यवाही वेळी २,०००/रु ची लाचेची मागणी केली आरोपी क्र. ०१ ने सदर लाच रक्कम आरोपी क्र.२ याचे मार्फतीने स्विकारण्याची तयारी दर्शविली प्रत्यक्ष सापळा कार्यवाही वेळी आरोपी क्र.२ यांनी लाच रक्कम २,०००/रु स्विकारल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ७,१३(१)(ड) भादंवि. सहकलम १३ (२) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पारधी एसीबी भंडारा पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) मोटार सायकलची चोरी. :—**

दिनांक ०३/०८/२०१७ चे १५.०० वा. दर. यातील फिर्यादी जितेन्द्र भिमराव सागोळे वय २९ वर्ष, रा. चिचटोली/ पळसगाव याची सिडी डिलक्स कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम एच ३५ एन ७१४६ जुनी वापरती किंमती २०,०००/—रु. ची साकोली बसस्टॉपचे खुल्या आवारात ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन विटाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०४/०८/२०१७ चे १४.०० वा. यातील आरोपीने कोंबडयाच्या वादावरुन फिर्यादी सोबत भांडण करुन डोक्यावर विटाने मारुन जखमी केल्याने फिर्यादी नरेंद्र विठ्ठल भैसारे वय ४५ वर्ष, रा. गणेश वार्ड साकोली यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन लाकडी काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०४/०८/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रकाश खटु बोरीकर वय २६ वर्ष, रा. विठ्ठल गुजरी वार्ड पवनी हा व आरोपी हे सख्ये भाऊ असुन एकाच घरी राहतात यातील फिर्यादीने घरची मोटार सायकल घेवुन घरचेच चिकन दुकानात नेले म्हणुन आरोपीने फिर्यादीस तु दुकानात पैदल का गेला नाही म्हणुन फिर्यादी सोबत भांडण, शिवीगाळ केली व फिर्यादीचे हातातील लाकडी काठी हिसकावुन त्याचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने व धंदा कसा करतोस म्हणुन पाहुण घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**५) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे पायी जाणाऱ्या इसमास धडक मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २७/०७/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी सत्यवान मगरुजी माकडे वय ३० वर्ष, रा. कोंढा हा पायी फिरण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची माहिती न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**६) मोटार सायकलची मोटार सायकलला समोरुन धडक लागुन दोन जखमी . :—**

दिनांक ०४/०८/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी नारायण लक्ष्मण बोन्द्रे वय २६ वर्ष, रा. नेरोडी हा बैल जखमी नमीता वलथरे वय १८ वर्ष, हिचे सोबत आपले मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ डी एस ९७०७ ने कारधा येथे रोडणे जात असता भिलेवाडा कडुन समोरुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक दिल्याने फिर्यादी व त्याची बहीण जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ अन्वये. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**७) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक ०४/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे तुमसर, सिहोरा, गोबरवाही व साकोली येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ५६ गुन्हे दाखल करून ४० लिटर हा.भ. दारू किंमती ३३००/—रु. २ लिटर देशी दारु किंमती ७८०/—रु. असा एकुण किंमती ४०८० /रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

05-8

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

PSt

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.